# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. १२
## सभावृत्तांत

दिनांक :- ८/०२/२०१७ वेळ :- दुपारी १२.३० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक ०८/०२/२०१७ रोजी दुपारी १२.३० वाजता ब प्रभाग कार्यालयाचे मा.क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रिय कार्यालय यांचे दालनात आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी अध्यक्षा
२. मा. ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव
३. मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन
४. मा. डोके अपर्णा निलेश
५. मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख
६. मा.पवार अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
७. मा. बारणे निलेश हिरामण

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.एम.दंडवते – क्षेत्रिय अधिकारी ब क्षेत्रीय कार्यालय, मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.देवण्णा गटटुवार – कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.एकनाथ पाटील – कार्यकारी अभियंता, विदयुत विभाग, मा.एम.एम.इनामदार, लेखाधिकारी , ब क्षेत्रीय कार्यालय , श्री.के.डी.दरवडे,सहा.आरोग्याधिकारी, मा.के.बी.पारोल, मुख्य आरोग्य निरिक्षक, मा.आर.एन.भाट, मुख्य आरोग्य निरिक्षक, ब क्षेत्रीय कार्यालय, मा.राजू कोतवाल, क्रिडा पर्यवेक्षक, क्रिडा विभाग इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष सौ.आशाताई सुर्यवंशी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

तद्नंतर मा.अध्यक्ष यांनी मनपा सार्वत्रिक निवडणूक २०१७ आचारसंहिता विचारात घेता मागील कार्यपत्रिका क्र. ११, दिनांक ११/१//२०१७ रोजीचा सभावृत्तांत पुढील महिन्याचे (मार्च २०१७) सभेमध्ये घेण्यात यावा. असे प्रकट केले.

तदनंतर मा.अध्यक्ष व मा.सन्मा.सदस्यांचे मान्यतेने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांक १ प्रभाग कमांक २१, ४२ व ५३ हे तीन प्रभाग (Open Defecation Free ) हागंणदारी मुक्त घोषीत करणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे
मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव.

ठराव क्र. ८५

दि. ८/२/२०१७

सुचक :- मा.डोके अपर्णा निलेश

विषय क्र. १

विभाग – आरोग्य ब क्षेत्रीय कार्यालय

अनुमोदक:मा.चिंचवडे पाटील आश्विनी गजानन

संदर्भ :- क्र.बक्षेआ/स्वभा/कावि/२३४/२०१७, दिनांक ८/२/२०१७ रोजीचा मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा प्रस्ताव .

देशातील सर्व शहरांमधील नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता शहरांना स्वच्छतेची सवय व शहरातील सर्व नागरीकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करुन देण्याचे ध्येय गाठण्यासाठी दिनांक २/१०/२०१४ पासून केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान (नागरी) संपुर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा केलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने देखील पत्र क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दिनांक १५/५/२०१५ अन्वये केंद्र शासनाचे धर्तीवर स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राबविण्याचे ठरवून दिनांक ३१/३/२०१७ पर्यंत शहरे हागंणदारी मुक्त (Open Defecation Free ) करण्याचे उददीष्ठ निश्चित केलेले आहे.

त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील सर्व नागरीकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे याकरीता स्वच्छ भारत अभियान व स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत, शाचालयाची सुविधा उपलब्ध नसलेल्या नागरीकांना वैयक्तीक शौचालय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच काही ठिकाणी सार्वजनिक शौचालये उपलब्ध करुन देणेत आलेली आहेत. उघडयावर शौचास जाणा-या नागरीकांचे प्रबोधन करुन त्यांना शौचालयांचा वापर करणेबाबत प्रवृत्त करणेत येत आहे.

मा.आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांचेकडील पत्र क्रमांक मातवि/१२/कावि/९६/२०१६ दिनांक १/४/२०१६ अन्वये कळविलेनुसार दिनांक ३१/३/२०१७ पुर्वी टप्या टप्याने पिंपरी चिंचवड शहर हागणदारी मुक्त करण्याचे उददीष्ठ निश्चित केलेले आहे. त्या अनुषंगाने ब क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्रमांक १) २१ दळवीनगर, २) ४२ भाटनगर ३) ५३ वाकड हे तीन प्रभाग दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ पासून हागणदारी मुक्त (Open Defecation Free ) घोषीत करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-

[आशाताई ज्ञानेश्वर सुर्यवंशी ]

अध्यक्ष

ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,

ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३

जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ १३ /२०१७.

दिनांक : ०४ /०३ /२०१७

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना

सही/-

प्रशासन अधिकारी तथा

सचिव (सभाशाखा)

ब प्रभाग समिती